| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>DIRECTORATE OF EDUCATION<br>(Secondary & Higher Secondary)<br>Maharashtra State<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|
| w'site : education.maharashtra.gov.in | Phone : (020) 2612 0361 | e-mail : doehighersec@gmail.com |


**परिपत्रक**

**क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२३/**
**दिनांक-१६/०५/२०२३**

**प्रति,**
**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**सर्व**

**विषय - इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन.२०२३-२४ साठी पूर्वतयारी सुरु करणेबाबत.**

**संदर्भ :- १.शासन निर्णय क्र.प्रवेश-२०१८/प्रक्र.३३३/एसडी-२ दिनांक.२३/०६/२०२०**
**२.शासन निर्णय क्र.प्रवेश-०४२२/प्रक्र.४१/एसडी-२ दिनांक.०९/०६/२०२२**
**३.राज्यस्तर इ.११वी प्रवेश नियंत्रण समितीची बैठक दि.२६/०४/२०२३**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, सन.२०१७-१८ पासून मुंबई महानगर क्षेत्र, पुणे-पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रांसह नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील उच्च माध्यमिक शाळांमध्ये इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात येतात. सन.२०२३-२४ मध्ये मुंबई महानगर क्षेत्र, पुणे-पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रांसह नाशिक, अमरावती व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील इ.११वी प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने इ.११वी प्रवेश प्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन व दिशानिर्देश विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे.

राज्यमंडळ इयत्ता.१०वी परीक्षा २०२३ समाप्त झालेली आहे तसेच सीबीएसई, सीआयएससीई इत्यादी मंडळांचे इ.१०वी निकालही जाहीर झालेले आहेत. राज्यमंडळाचा इ.१०वी निकाल लवकरच अपेक्षित आहे. त्यामुळे इ.१०वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन.२०२३-२४ मधील प्रवेश प्रक्रियेची पूर्वतयारी सुरु करणे आवश्यक आहे. त्यानुसार इ.११वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन विद्यार्थी पालकांना मिळावे व प्रवेशाबाबत सर्व सूचना वेळेत निर्गमित करता याव्यात यानुषंगाने आवश्यक नियोजन व कृती आराखडा आपले स्तरावरुन तयार करावा. क्षेत्रीय स्तरावर समन्वय यंत्रणा सक्षम करुन त्यानुसार कार्यवाही करावी.

उक्त ऑनलाईन प्रवेश क्षेत्र वगळता उर्वरित महाराष्ट्रातील प्रवेश प्रचलित पद्धतीनुसार कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरुन करण्यात येत आहेत. अशा ऑनलाईन क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांनाही या प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करावे.

मागासवर्गीय अथवा विशेष प्रवर्गात समाविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांना लागू असलेल्या आरक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे अगोदरच काढून ठेवणेबाबत जागृत करावे. अशा विद्यार्थ्यांना सदर कागदपत्रे वेळेत मिळवून देण्यासाठी विशेष मोहिम राबविणेबाबत विनंती सबंधित महसूल यंत्रणेस करणे, माध्यमिक शाळांनी आपले विद्यालयातील इ.९वी १०वी मधील विद्यार्थ्यांना याबाबत सूचित करून शाळेत असतांनाच अशी कागदपत्रे विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे अशा उपाययोजना कराव्यात.

इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रक्रिया २०२३-२४ साठी पूर्वतयारी त्वरीत सरु करणेत यावी. त्यासाठी प्रवेश प्रक्रियेचे टप्पे समजावून घेऊन त्यानुसार नियोजन करावे. विद्यार्थी, पालक यांचेसाठी उद्बोधन वर्ग आयोजित करावेत, शाळा मार्गदर्शन केंद्रांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करावे. प्रवेश प्रक्रियेबाबत व्यापक प्रसिद्धी द्यावी. शंका समाधान व्यवस्था करावी.

सन.२०२३-२४ इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रक्रियेच्या विविध टप्पे व संभाव्य वेळापत्रक सोबत संलग्न आहे. त्यानुसार प्रसिद्धी देऊन पुढील कार्यवाही सुरु करणेत यावी.

**(संपत सूर्यवंशी)**
**शिक्षण संचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**

**शिक्षण संचालनालय (मायमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**

## प्रवेश प्रक्रियेचे संभाव्य टप्पे

**(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका प्रवेश क्षेत्रांसाठी)**

https://11thadmission.org.in

| क्र | कार्यवाहीचे टप्पे | कालावधी | कार्यवाहीतील घटक |
|---|---|---|---|
| | **पूर्वतयारी** | | |
| १ | विद्यार्थी, पालक, कनिष्ठ महाविद्यालये यांचे उद्बोधन, प्रशिक्षण, जनजागृती व प्रसिद्धी | माहे- मे, २०२३ | शिक्षण उपसंचालक, शाळा, प्रसिद्धी व जनसंपर्क माध्यमे |
| २ | **Mock Demo Registration for Students**<br>विद्यार्थ्यांसाठी संकेतस्थळावर नोंदणी व अर्जाचा भाग-१ Dummy Form भरणेबाबात सराव करणे | दि.२० मे, २०२३ ते<br>दि.२४ मे, २०२३ पर्यंत<br>केवळ विद्यार्थ्यांना सरावासाठी | विद्यार्थी स्वत: पालकांच्या मदतीने<br>(सराव) |
| | **(ऑनलाईन नोंदणी व सर्वसाधारण माहिती)** | **अर्ज भाग-१ भरणे** | |
| ३ | **Actual Student Registration & Part-१**<br>विद्यार्थ्यांसाठी संकेतस्थळावर नोंदणी व अर्जाचा भाग-१ भरणे अर्ज प्रमाणित /Verify करुन घेणे | दि.२५ मे, २०२३ स.११:00 वा पासून राज्यमंडळ इ.१०वी निकालापर्यंत. | विद्यार्थी स्वत: पालकांच्या मदतीने |
| * | **Form Part-१ Verification by GCs**<br>विद्यार्थी प्रवेश अर्जातील माहिती, भाग-१ ऑनलाईन तपासून प्रमाणित/ Verify करणे. | दि.२५ मे, २०२३ पासून सुरु राज्यमंडळ इ.१०वी निकालानंतर दोन दिवस पर्यंत | माध्यमिक शाळा / अधिकृत मार्गदर्शन केंद्र व विद्यार्थी ## |
| | **टीप- प्रत्येक फेरीपूर्वी Registration & Verifiaction सुरु असेल.** | | |
| ४ | **Jr. College Registration**<br>उच्च माध्यमिक विद्यालय नोंदणी.<br>कमविं नी भरलेली माहिती तपासून शिउसं यांनी ऑनलाईन प्रमाणित (Verify/ Edit) करणे. | दि.२० मे, २०२३ पासून सुरु राज्यमंडळ इ.१०वी निकाल येईपर्यंत | उच्च माध्यमिक शाळा व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय |
| | **(प्रवेशासाठी पसंतीची विद्यालये नोंदविणे)** | **अर्ज भाग-२ भरणे** | |
| ५ | **CAP Option Form for students (Part-२)**<br>विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या पोर्टलवर पसंतीक्रम नोंदविणे, (प्रवेश अर्जाचा भाग-२ भरणे) | राज्यमंडळ इ.१०वी निकालानंतर सुरु होईल, (साधारणपणे पाच दिवस)<br>टीप- प्रत्येक फेरीपूर्वी सुरु असेल. | नोंदणी केलेले विद्यार्थी स्वत: पालकांच्या मदतीने |
| * | कोटांतर्गत राखीव जागांवरील प्रवेश सुरु<br>अल्पसंख्याक कोटा -५०%<br>इनहाऊस कोटा - १०%<br>व्यवस्थापन कोटा- ०५% | राज्यमंडळ इ.१०वी निकालानंतर सुरु होईल, (साधारणपणे पाच दिवस)<br>टीप- यासाठी कार्यवाहीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे देण्यात येईल. | विद्यार्थी व संबंधित उच्च माध्यमिक विद्यालये. |
| | **प्रवेश फेऱ्या** | **अलॉटमेंट व प्रवेश करणे** | |
| ६ | CAP नियमित फेरी -१ | राज्यमंडळ इ.१०वी निकालानंतर १० ते १५ दिवस | |
| ७ | CAP नियमित फेरी -२ | ७ ते ९ दिवस | |
| ८ | CAP नियमित फेरी -३ | ७ ते ९ दिवस | |
| ९ | CAP विशेष फेरी-१ | ७ ते ८ दिवस | आरक्षण लागू नाही |
| १० | CAP विशेष फेरी-२ (ATKT सहभाग) | एक आठवडा | प्रतीक्षा यादी (२-२ दिवस) |
| | **टीप- प्रत्येक प्रवेश फेरीसोबत कोटांतर्गत प्रवेश समांतर सुरु असतील.** | | |
| * | उर्वरित विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठी - विशेष फेऱ्या<br>दैनिक गुणवत्ता फेऱ्या (DMR- Daily Merit Round) | आवश्यकता भासल्यास याबबात वेळापत्रक जाहीर केले जाईल. | दैनंदिन अर्ज व दैनंदिन गुणवत्ता |
| | **#FCFS Round होणार नाही.** | | |

**लक्ष्य - ऑगस्ट २०२३ अखेर ११वी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे.** **(विशेष फेरी-१ नंतर इ.११वी वर्ग सुरु करता येतील)**

*GC- Guidance Centre

शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१